MHLA160000602020

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.०८/२०२०**
**शासन वि. नागेंद्र**

## –:: नि.क्र.१ लगत आदेश ::–

मा. उच्च न्यायालय यांनी दि.०९/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ पर्यंत फौजदारी प्रकरणाबाबत विशेष मोहीम (Special Drive) आयोजित केलेली आहे. त्याबाबत मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर यांनी पत्र जा.क्र./जि.वी.से.प्रा./३४३/२०२६ तारीख ०७/०३/२०२६ प्रमाणे कळविलेले आहे.

०२. सदर प्रकरण हे महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाचे कलम १२–अ च्या गुन्ह्याकरिता दि.२७/०१/२०२० रोजी दाखल झाले. तेव्हापासून सदर प्रकरणामध्ये कोणतीही प्रगती नाही. आरोपीला वॉरंटची बजावणी झालेली नाही. पोलिसांनी आरोपी मिळून न आल्याने वॉरंट विनातामील परत केलेले आहेत. प्रकरण फार जुने आहे. भविष्यामध्ये सुध्दा सदर वॉरंटची बजावणी होऊन आरोपी हजर होण्याची शक्यता दिसून येत नाही. पोलिसांनी व अभियोग पक्षाने आरोपीचे वॉरंट बजावण्यास कसूर केला. त्यामुळे सदर प्रकरण गुणवत्तेवर सुध्दा अभियोग पक्षाच्या बाजुने निकाली काढता येणार नाही. सदर प्रकरण विनाकारण व विना प्रगती प्रलंबित ठेवणे अनुचित ठरेल. सबब सदर प्रकरण हे विशेष मोहीमेअंतर्गत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २८१ प्रमाणे बंद करण्यास योग्य आहे. त्याप्रमाणे सदर प्रकरण बंद करण्यात येते व आरोपीला दोषमुक्त करण्यात येते.

०३. अपील कालावधी संपल्यानंतर अपील दाखल न झाल्यास जप्त मुद्देमाल म्हणजे जुगाराचे साहित्य नष्ट करावेत व जप्त रक्कम ही शासन जमा करावी.

०४. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:32:08 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – १३–०३–२०२६**

**( शरद अ. सुरजुसे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**देवणी.**